# राज्याचा उन्हाळी हंगाम २०२०-२१ अंतिम व खरीप हंगाम २०२१-२२
# हवामान, पिक पेरणी व पिक परिस्थितीचा दिनांक १४/०६/२०२१ अखेरचा साप्ताहिक अहवाल

**हवामान व पर्जन्यमान** : राज्यात नैऋृत्य मान्सूनचा पाऊस दाखल झाला आहे. अहवाल कालावधीत बहुतांश विभागात आकाश ढगाळ होते.

कोंकण विभागात बहुतांश ठिकाणी जोरदार ते अतिजोरदार तर तुरळक ठिकाणी मुसळधार स्वरुपाच्या पावसाची नोंद झाली. नाशिक, पुणे विभागात बहुतांश ठिकाणी हलक्या ते मध्यम स्वरुपाच्या तर कोल्हापूर, औरंगाबाद, लातूर, अमरावती व नागपूर विभागात बहुतांश ठिकाणी हलक्या ते मध्यम व तुरळक ठिकाणी जोरदार स्वरुपाच्या पावसाची नोंद झाली.

प्राथमिक नजर अंदाज अहवालानुसार दि.११.०६.२०२१ अखेर माहे जून-२०२१ मध्ये पावसामुळे शेतीपिके व फळपिकांचे झालेल्या नुकसानीची माहिती निरंक आहे.

**उन्हाळी हंगाम-२०२०-२१ (अंतिम अहवाल)**

राज्यात उन्हाळी पिकांखालील सरासरी क्षेत्र १.८१ लाख हेक्टर असून दि.१४ जून, २०२१ अखेर ४.०२ लाख हेक्टर क्षेत्रावर (२२२%) पेरणी झाली आहे. उन्हाळी भात, भुईमूग, सुर्यफुल, ज्वारी, बाजरी, मका पिकांच्या काढणी व मळणीची कामे अंतिम टप्प्यात आहेत.

**खरीप हंगाम-२०२१-२२ पिक पेरणी -**

राज्यात खरीप पिकांचे सरासरी क्षेत्र (ऊस वगळून) १४१.९८ लाख हेक्टर असून दि.१४ जून, २०२१ अखेर ४.३० लाख हेक्टर क्षेत्रावर (३.०३%) पेरणी झाली आहे. तसेच राज्यात खरीप पिकांचे ऊस पिकासह सरासरी क्षेत्र १५१.३३ लाख हेक्टर असून ४.३०३ लाख हेक्टर क्षेत्रावर (२.८४%) पेरणी/लागवड झाली आहे. मागील वर्षी दि.१५.०६.२०२० रोजी संपणाऱ्या सप्ताहाअखेर राज्यातील ऊस पिकासह पेरणी क्षेत्र ७.६४ लाख हे. (५%) तर ऊस पिक वगळून पेरणी क्षेत्र ७.५३ लाख हे. (५.३%) होते. खरीप हंगामासाठी जमीनीच्या पूर्वमशागतीची तसेच भात व रागी पिकाच्या रोप वाटिका तयार करण्याची कामे सुरु आहेत. काही विभागात पेरणीची कामे सुरु झाली आहेत.

**पर्जन्यमान (२०२१)**

दि.१ जून ते १४ जून, २०२१ या कालावधीमधील राज्यातील सरासरी पाऊस ९६.९ मि.मी. असून दि.१४ जून, २०२१ पर्यंत ११७.९० मि.मी. म्हणजेच सरासरीच्या १२१.७० टक्के पाऊस झाला. मागील वर्षी दि.१४.०६.२०२० अखेर ११७.१० मि.मी. म्हणजेच सरासरीच्या १२०.८० टक्के पाऊस झाला.

राज्यात दि.१ जून ते १४ जून, २०२१ अखेरीस सरासरीच्या तूलनेत प्रत्यक्ष पडलेल्या पावसानुसार (प्रागतिक) जिल्ह्याची वर्गवारी खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | पर्जन्यमान टक्केवारी | जिल्हे संख्या | जिल्ह्यांची नावे |
|---|---|---|---|
| १ | ० ते २५ % | १ | नंदुरबार |
| २ | २५ ते ५० % | ० | --- |
| ३ | ५० ते ७५ % | ४ | नाशिक, जळगांव, कोल्हापूर, गडचिरोली. |
| ४ | ७५ ते १०० % | ८ | रायगड, सिंधुदुर्ग, धुळे, पुणे, सातारा, अकोला, भंडारा, गोंदिया. |
| ५ | १०० % पेक्षा जास्त | २१ | ठाणे, रत्नागिरी, पालघर, अहमदनगर, सोलापूर, सांगली, औरंगाबाद, जालना, बीड, लातूर, उस्मानाबाद, नांदेड, परभणी, हिंगोली, बुलढाणा, वाशिम, अमरावती, यवतमाळ, वर्धा, नागपूर, चंद्रपूर. |

राज्यात दि.१४ जून, २०२१ अखेर पर्जन्यमान सरासरीच्या तूलनेत एकूण ३५५ तालूक्यांपैकी ७ तालुक्यात ० ते २५ %, ३० तालूक्यांत २५ ते ५० %, ३९ तालूक्यात ५० ते ७५ %, ६१ तालूक्यात ७५ ते १००% तर २१८ तालूक्यात १०० % पेक्षा जास्त पाऊस झाला आहे.

**उन्हाळी हंगाम सन-२०२०-२१ मधील राज्यस्तरिय पेरणी क्षेत्र (लाख हे.) व टक्केवारी** (दि.१४ जून, २०२१ अखेर अंतिम)




**उन्हाळी हंगाम सन-२०२०-२१ मधील पेरणी क्षेत्राचा सरासरी पेरणी क्षेत्राशी तुलनात्मक तक्ता** (दि.१४ जून, २०२१ अखेर अंतिम)



**उन्हाळी हंगाम सन-२०२०-२१ मधील पिकनिहाय पेरणी क्षेत्राचा तुलनात्मक तक्ता** (क्षेत्र लाख हे.) (दि.१४ जून, २०२१ अखेर अंतिम)




## विभागनिहाय पिक परिस्थिती

### कोकण विभाग

**हवामान-** अहवाल कालावधीत विभागात आकाश ढगाळ होते. विभागात बहुतांश ठिकाणी जोरदार ते अतिजोरदार तर तुरळक ठिकाणी मुसळधार स्वरुपाच्या पावसाची नोंद झाली.

**उन्हाळी हंगाम-२०२०-२१**

विभागात उन्हाळी पिकाखालील सरासरी क्षेत्र ०.१० लाख हेक्टर असून, दि.१४ जून, २०२१ अखेर ०.०८ लाख हेक्टर क्षेत्रावर (८४%) पेरणी झाली आहे. विभागात भात व भुईमूग पिकांच्या काढणीची कामे पुर्ण झाली आहेत.

**खरीप हंगाम-२०२१-२२**

विभागात खरीप पिकाखालील सरासरी क्षेत्र ४.४२ लाख हेक्टर असून, दि.१४ जून, २०२१ अखेर ०.०००७ लाख हेक्टर क्षेत्रावर (०.०२%) पेरणी झाली आहे. विभागात खरीप हंगामासाठी जमीनीच्या पूर्वमशागतीची व रोप वाटिका तयार करण्याची कामे सुरु आहेत. पालघर, रत्नागिरी व सिधुदुर्ग जिल्हयात अनुक्रमे १७३.९ हे., ९४० हे. व ६२१ हे. क्षेत्रावर भात पिकाच्या रोपवाटिकांची पेरणी झाली आहे. तर पालघर जिल्हयामध्ये ४० हे. क्षेत्रावर नाचणी पिकांच्या रोपवाटिकांची पेरणी झाली आहे.

**किड व रोग** - निरंक

### नाशिक विभाग

**हवामान-** अहवाल कालावधीत विभागात आकाश ढगाळ होते. विभागात बहुतांश ठिकाणी हलक्या ते मध्यम स्वरुपाच्या पावसाची नोंद झाली.

**उन्हाळी हंगाम-२०२०-२१**

विभागात उन्हाळी पिकाखालील सरासरी क्षेत्र ०.२७ लाख हेक्टर असून, दि.१४ जून, २०२१ अखेर ०.५५ लाख हेक्टर क्षेत्रावर (१९९%) पेरणी झाली आहे. विभागात उन्हाळी पिकांची काढणी पुर्ण झाली आहे.

**खरीप हंगाम-२०२१-२२**

विभागात खरीप पिकाखालील सरासरी क्षेत्र २१.१९ लाख हेक्टर असून दि.१४ जून, २०२१ अखेर १.३४ लाख हेक्टर क्षेत्रावर (६.३४%) पेरणी झाली आहे. भात व नागली रोपवाटिका तयार करण्याची, इतर पिकांसाठी पूर्वमशागतीची तसेच मका व कापूस पेरणीची कामे सुरु आहेत. पुर्वहंगामी, सुरु व खोडवा ऊस वाढीच्या अवस्थेत आहे.

**किड व रोग -निरंक**

## पुणे विभाग

**हवामान-** अहवाल कालावधीत विभागात आकाश ढगाळ होते. विभागात बहुतांश ठिकाणी हलक्या ते मध्यम स्वरुपाच्या पावसाची नोंद झाली.

**उन्हाळी हंगाम-२०२०-२१**

विभागात उन्हाळी पिकाखालील सरासरी क्षेत्र ०.१९ लाख हेक्टर असून, दि.१४ जून, २०२१ अखेर ०.३८ लाख हेक्टर क्षेत्रावर (१९७%) पेरणी झाली आहे. विभागात उन्हाळी बाजरी, भुईमूग व मका पिकांच्या काढणीची कामे पुर्ण झाली आहेत.

**खरीप हंगाम-२०२१-२२**

विभागात खरीप पिकाखालील सरासरी क्षेत्र ८.६७ लाख हेक्टर असून, दि.१४ जून, २०२१ अखेर ०.१३ लाख हेक्टर क्षेत्रावर (०.४६%) पेरणी झाली आहे. विभागात पुणे जिल्हयात ३३३० हे. क्षेत्रावर भात व २० हे. क्षेत्रावर नाचणी रोपवाटिका पेरणी झाली आहे. खरीप हंगाम पूर्वमशागतीची कामे सुरु झाली आहेत.

**किड व रोग - निरंक**

## कोल्हापूर विभाग

**हवामान-** अहवाल कालावधीत विभागात आकाश ढगाळ होते. विभागात बहुतांश ठिकाणी हलक्या ते मध्यम तर तुरळक ठिकाणी जोरदार स्वरुपाच्या पावसाची नोंद झाली.

**उन्हाळी हंगाम-२०२०-२१**

विभागात उन्हाळी पिकाखालील सरासरी क्षेत्र ०.११ लाख हेक्टर असून, दि.१४ जून, २०२१ अखेर ०.१० लाख हेक्टर क्षेत्रावर (९०%) पेरणी झाली आहे. विभागात भुईमूग वगळता भात, मका, सुर्यफुल पिकांच्या काढणीची कामे पुर्ण झाली आहेत.

**खरीप हंगाम-२०२१-२२**

विभागात खरीप पिकाखालील सरासरी क्षेत्र ८.०३ लाख हेक्टर असून दि.१४ जून, २०२१ अखेर ०.७१ लाख हेक्टर क्षेत्रावर (८.८%) पेरणी झाली आहे. चालू सप्ताहात बहुतांश ठिकाणी पाऊस झाला आहे. खरीप हंगामाच्या पूर्व मशागतीची कामे सुरु आहेत. पेरणी झालेल्या ठिकाणी पिके उगवणीच्या अवस्थेत आहेत. पिक परिस्थिती समाधानकारक आहे. भात व रागी पिकाच्या रोपवाटीका टाकणेची कामे सुरू आहेत. गत हंगामातील आडसाली व पुर्व हंगामी ऊस पिक जोमदार वाढीच्या अवस्थेत आहे.

**किड व रोग -निरंक**

## औरंगाबाद विभाग

**हवामान-** अहवाल कालावधीत विभागात आकाश ढगाळ होते. विभागात बहुतांश ठिकाणी हलक्या ते मध्यम तर तुरळक ठिकाणी जोरदार स्वरुपाच्या पावसाची नोंद झाली.

**उन्हाळी हंगाम-२०२०-२१**

विभागात उन्हाळी पिकाखालील सरासरी क्षेत्र ०.०६ लाख हेक्टर असून, दि.१४ जून, २०२१ अखेर ०.३७ लाख हेक्टर क्षेत्रावर (६१६%) पेरणी झाली आहे. विभागात पिकांच्या काढणीची कामे पुर्ण झाली आहेत.

**खरीप हंगाम-२०२१-२२**

विभागात खरीप पिकाखालील सरासरी क्षेत्र २०.२३ लाख हेक्टर असून, दि.१४ जून, २०२१ अखेर ०.४६ लाख हेक्टर क्षेत्रावर (२.२५%) पेरणी झाली आहे.

**किड व रोग -निरंक**

## लातूर विभाग

**हवामान-** अहवाल कालावधीत विभागात आकाश ढगाळ होते. विभागात बहुतांश ठिकाणी हलक्या ते मध्यम तर तुरळक ठिकाणी जोरदार स्वरुपाच्या पावसाची नोंद झाली.

**उन्हाळी हंगाम-२०२०-२१**

विभागात उन्हाळी पिकाखालील सरासरी क्षेत्र ०.३० लाख हेक्टर असून, दि.१४ जून, २०२१ अखेर ०.६५ लाख हेक्टर क्षेत्रावर (२१५%) पेरणी झाली आहे. भुईमूग, सुर्यफुल व मका पिकांच्या काढणीची कमे अंतिम टप्प्यात आहेत.

**खरीप हंगाम-२०२१-२२**

विभागात खरीप पिकाखालील सरासरी क्षेत्र २७.९४ लाख हेक्टर असून, दि.१४ जून, २०२१ अखेर ०.०८ लाख हेक्टर क्षेत्रावर (०.०३%) पेरणी झाली आहे. विभागात पेरणीस अद्याप सुरुवात झालेली नाही.

**किड व रोग -निरंक**

## अमरावती विभाग

**हवामान-** अहवाल कालावधीत विभागात आकाश ढगाळ होते. विभागात बहुतांश ठिकाणी हलक्या ते मध्यम तर तुरळक ठिकाणी जोरदार स्वरुपाच्या पावसाची नोंद झाली.

**उन्हाळी हंगाम-२०२०-२१**

विभागात उन्हाळी पिकाखालील सरासरी क्षेत्र ०.३० लाख हेक्टर असून, दि.१४ जून, २०२१ अखेर ०.६८ लाख हेक्टर क्षेत्रावर (२२५%) पेरणी झाली आहे. उन्हाळी भुईमूग व मका पिकांच्या काढणीची कामे पुर्णत्वाकडे आहेत.

**खरीप हंगाम-२०२१-२२**

विभागात खरीप पिकाखालील सरासरी क्षेत्र ३२.२४ लाख हेक्टर असून, दि.१४ जून, २०२१ अखेर ०.९५ लाख हेक्टर क्षेत्रावर (२.९३%) पेरणी झाली आहे.

**किड व रोग - निरंक**

## नागपूर विभाग

**हवामान-** अहवाल कालावधीत विभागात आकाश ढगाळ होते. विभागात बहुतांश ठिकाणी हलक्या ते मध्यम तर तुरळक ठिकाणी जोरदार स्वरुपाच्या पावसाची नोंद झाली.

**उन्हाळी हंगाम-२०२०-२१**

विभागात उन्हाळी पिकाखालील सरासरी क्षेत्र ०.४७ लाख हेक्टर असून, दि.१४ जून, २०२१ अखेर १.२२ लाख हेक्टर क्षेत्रावर (२५७%) पेरणी झाली आहे. विभागात भात, भुईमूग, सोयाबीन व मूग पिकांच्या काढणी व मळणीची कामे अंतिम टप्प्यात आहेत.

**खरीप हंगाम-२०२१-२२**

विभागात खरीप पिकाखालील सरासरी क्षेत्र १९.२६ लाख हेक्टर असून दि.१४ जून, २०२१ अखेर ०.७२ लाख हेक्टर क्षेत्रावर (३.७२%) पेरणी झाली आहे.

**किड व रोग - निरंक**

**महाराष्ट्र राज्यातील उन्हाळी हंगामातील मुख्य पिकाखालील दि.१४.०६.२०२१ अखेरचा अंतिम पेरणी अहवाल**

**(क्षेत्र हेक्टर मध्ये)**

| अ.क्र. | पिके | सरासरी क्षेत्र | मागिल वर्षाची पेरणी दि.१२.०६.२०२० | प्रत्यक्ष पेरणी | पेरलेल्या क्षेत्राची सरासरी क्षेत्राशी टक्केवारी | पेरलेल्या क्षेत्राची मागील वर्षाच्या पेरणी क्षेत्राशी टक्केवारी | +/- (%) प्रत्यक्ष पेरणी क्षेत्राची मागील वर्षाच्या पेरणी क्षेत्राशी तुलना |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | उन्हाळी भात | ५१०८८ | ८७३६० | ११८२०६ | २३१ | १३५ | ३५ |
| २ | उन्हाळी मका | ३६७०२ | ७५५०० | ६०१८२ | १६४ | ८० | -२० |
| ३ | इतर तृणधान्य | १८६४५ | ६१७५२ | ४८९४१ | २६२ | ७९ | -२१ |
| | **एकुण तृणधान्य** | **१०६४३४** | **२२४६१२** | **२२७३२९** | **२१४** | **१०१** | **१** |
| ४ | **इतर कडधान्य** | **३८९४** | **१२६८५** | **१८८०८** | **४८३** | **१४८** | **४८** |
| | **एकुण कडधान्य** | **३८९४** | **१२६८५** | **१८८०८** | **४८३** | **१४८** | **४८** |
| ५ | उन्हाळी भुईमुग | ६८३४८ | ८८५८७ | १३४८५६ | १९७ | १५२ | ५२ |
| ६ | उन्हाळी सुर्यफ़ुल | ६३३ | ४२१७ | २५४१ | ४०१ | ६० | -४० |
| ७ | उन्हाळी तीळ | १४७३ | ४०१३ | ७८३३ | ५३२ | १९५ | ९५ |
| ८ | ईतर गळीतधान्य | ३४९ | १२७६ | १०२४२ | २९३७ | ८०३ | ७०३ |
| | **एकुण गळीतधान्य** | **७०८०३** | **९८०९३** | **१५५४७२** | **२२०** | **१५८** | **५८** |
| | **एकुण उन्हाळी पिके** | **१८११३२** | **३३५३८९** | **४०१६०९** | **२२२** | **१२०** | **२०** |

टिप- पेरणी क्षेत्र नजर अंदाजीत